२६ ०००/१०३

कायम विनाअनुदान तत्वावर
(माध्यम इंग्रजी)

जाक्र. प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/१२-१३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 5 NOV 2012

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड, पुणे

विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात परवानगी मिळालेल्या नविन खाजगी प्राथमिक शाळेस सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरणाने परवानगी देणेबाबत. . .

संदर्भ : १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हीएसएल १००३/(५०९/२००३)/प्राशि ३ दिनांक २४ जून २००३
२. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र.माशानु २००७/(१००१/०७)/माशि १. दिनांक १९ ऑक्टोबर २००७
३. या कार्यालयाचे पत्र क्र.प्रा.प्राशि ३/खाप्राशा/मान्यता/पुवि/ दिनांक १५/७/२००३
४. आपले पत्र क्र. शिक्षण/खाप्राशा/३//कावि/२३७/१२ दिनांक १४/९/२०१२

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.३ चे पत्र कृपया पहावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमासाठी सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००८ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगवी, पुणे २७. | मॉडर्न इंग्लिश मेडियम स्कूल, सांगवी, पुणे. | १ ली | इंग्रजी | जून २००८ पासून |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था,नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम,पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्याआदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरीवर प्र. शि. उ. सं.
यांची सही असे.

(पाखरे सु.ब.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४.अध्यक्ष/सचिव,
छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगवी, पुणे २७.

**कायम विना अनुदान तत्वावर**
**इंग्रजी माध्यम**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/६२७/२०१६.
दिनांक :- २८/१०/२०१६

प्रति,
**मुख्याध्यापिका,**
मॉडर्न इंग्लिश मेडियम स्कुल
आनंदनगर, सांगवी

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३
२) संस्थेने सादर केलेले दि २८.१०.२०१६ चे हमीपत्र

संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| मॉर्डन इंग्लिश मेडियम स्कुल, आनंदनगर, सांगवी | इंग्रजी | नैसर्गिक वाढ | इ. २ री ते ७ वीच्या प्रथम वर्गास |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).
२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
७) संदर्भ क्रं २ अन्वये संस्थेने सादर केलेल्या हमीपत्रातील अटी शर्ती नुसार भविष्यात शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मागणी करता येणार नाही.

२८/१०/१६

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

542

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षापासून **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर** जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक: प्राशाव-२०१९/प्र.क्र.१२३ /एसएम-५

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

दिनांक: १६ सप्टेंबर,२०१९

**वाचा :-**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु- १११२/(२५८/२०१३)/प्राशि-३, दिनांक २/७/२०१३.

२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१८/प्रशा-ड/५१२-अ-१ /२५०५, दिनांक २८/०५/२०१८

३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/ड५१२-अ-१/ ३१४१, दिनांक १७/०७/२०१८

४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१८/वर्गवाढ/ड५१२/ ८८६, दिनांक १३/०३/२०१९

**शासन निर्णय :-**

खालीलप्रमाणे नमूद शाळांना **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर** इयत्ता ८ वी चा वर्ग खालील विवरणातील रकाना क्र.५ येथे नमूद शैक्षणिक वर्षापासून जोडण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | मागणी केलेला वर्ग | वर्षापासून |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम. सुंदरबाई भानसिंग हुजा-गुरुगोविंद इंग्लिश मिडीयम स्कुल सांगवी पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | सन २०१८-१९ |
| २ | रजपूत इंग्लिश मेडीयम स्कुल सांगली | इंग्रजी | इयत्ता ८ वी | सन २०१७-१८ |
| ३ | कै.रामू सखाराम हिरवे आदर्श मराठी प्राथमिक शाळा, गोडोली, ता.जि.सातारा | मराठी | इयत्ता ८ वी | सन २०१७-१८ |
| ४ | गुरूकुल कॉन्व्हेंट,१३६,शैलेश नगर,वाठोडा,नागपूर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | सन २०१७-१८ |

२. वरील शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार आवश्यक सर्व भौतिक सोयीसुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,

२) शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३) सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

Head Mistress/Master
Ideal Secondary English Medium
School, Sangvi,Pune 27

४) शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड क्रमांकाची नोंद सदर शाळेत व सरल पोर्टलवर ठेवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( हुसेन अ.मुकादम)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे,कोल्हापूर, नागपूर
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे,सांगली,सातारा,नागपूर.
७. निवडनस्ती एसएम-५.

CHATRAPATI SHIVAJI SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

# SMT. SUNDERBAI BHANSING HUJA GURUGOVIND

## ENGLISH MEDIUM SCHOOL

!! संहति कार्य साधिका: !!

Anand Nagar Sangavi, Pune - 411027.

(Recog. No. V.S.L. 1003 / ( 509 -2003) Pra. Shikshan -3, Dated 24th June 2003)

Ref No. MEMS 40 / 2023 / 2024 Date : 11-11-2023

हमीपत्र

मी. सौ. शोभा जयप्रकाश वरठी मुख्याध्यापिका श्रीमती सुंदरबाई भानसिंग हुजा गुरुगोविंद इंग्लिश मिडीयम स्कुल सांगवी. (Udise No 27251701511) कार्यरत असून. आपण त्रुटीमध्ये नमुद केल्याप्रमाणे त्रुटी क्र. २ 28/10/2016 ची मान्यता असून 28/08/2015 पासून शाळा बंद केल्याचे कोणतेही आदेश आम्हाला दिले नाहीत सदर प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होता. त्यानुसार आमच्या शाळेला दि. 28/10/2016 नुसार इ १ ली ते ८ वी ची मान्यता देण्यात आली आहे. त्याची मी साक्षीदार आहे. यात कोणतीही माहीती खोटी नाही. असे मी आपणास हमीपत्र लिहून देत आहे.

Head Mistress/Master
Smt.Sunderbai Bhansing Huja
Gurugovind English Medium
School, Sangvi, Pune 27